**महाराष्ट्र शासन**
**संचालक**
**मृद संधारण व पाणलोटक्षेत्र व्यवस्थापन, कृ.आ. म.रा.पुणे-1**
**दुरध्वनी क्रमांक-02026122611 फॅक्स क्र. 02026055322 ई-मेल jdasoil@gmail.com**

# विशेष घटक योजना - सन 2017-18
## मार्गदर्शक सूचना

**प्रस्तावना-** राज्यात जलसंधारण योजनेतंर्गत 30 जानेवारी 1996 पासून एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम राबविण्यास सुरूवात झाली आहे. या कार्यक्रमांतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत (विशेष घटक योजना) या निधीतून अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांच्या शेतावर मृद व जलसंधारणाचे विविध उपचार राबविण्यात येत आहेत. अनुसूचित जातीमधील शेतक-यांना उत्पन्नाचे इतर कायम स्वरुपी साधन नसते. त्यांचे संपूर्ण क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठीच्या मर्यादा लक्षात घेता त्यांच्या कृषि उत्पन्नात वाढ करण्यासाठी पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हा निर्णायक स्वरुपी कार्यक्रम राबविण्याचे शासनाने ठरविले आहे.

योजनेचा उद्देश- अनुसूचित जातीच्या शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांचे राहणीमान सुधारणे व त्यांचे स्थलांतर रोखणे, यासाठी शाश्वत निधी उपलब्ध करुन देणे असून राज्यातील शासनाने निश्चित करुन दिलेल्या जिल्हयातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या साधन संपत्तीच्या प्रमाणानुसार निधीसाठी जिल्हयांची निवड करण्यात आली आहे.

कृषि विकासाचा दर 4 टक्के करणे अभिप्रेत असून त्यासाठी केंद्र/राज्य शासनाने केलेल्या अनेक उपाययोजनेत मृद व जलसंधारण योजनेस महत्व देण्यात आलेले आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने शासन निर्णय क्रमांक असक-2007/प्र.क्र.121/जल-7 दिनांक 30.11.2007 नुसार राज्यातील अपूर्ण पाणलोट गतिमान पध्दतीने पूर्ण करण्यासाठी एक धडक मोहीम हाती घेवून " गतिमान पाणलोट " विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली आहे. सन 2007-08 ते सन 2016-17 पर्यंत राज्यस्तरीय सुकाणू समितीने मान्यता दिलेल्या पाणलोटांपैकी अपूर्ण असलेले पाणलोट पुर्ण करण्यासाठी व प्राधान्याने जलयुक्त शिवार योजनेतंर्गत निवडलेल्या गावामध्ये अनुसूचित जातीचे शेतक-यांचे शेतावर मृद संधारणाच्या कामासाठी सदरचा निधी प्राधान्याने वापरण्यात यावा. सदर योजना सन 2017-18 पासून जिल्हास्तरीय योजना झाली आहे. मा. जिल्हाधिकारी हे जिल्हा योजनांचे नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतात. योजना अंमलबजावणीसाठीच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत.

**1) पाणलोट निवड**

सन 2017-18 मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत विशेष घटक योजना, या योजनेअंतर्गत उपलब्ध होणा-या निधीतून जास्तीत जास्त अपूर्ण पाणलोट पूर्ण करण्याचे जिल्हास्तरावर नियोजन करावे. प्राधान्याने राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी अशा जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत निवडलेल्या गावातील पाणलोटांत समाविष्ट असलेल्या अनुसूचित जातीचे लाभार्थ्यांची संमती घेवून त्यांचे वैयक्तिक क्षेत्रावर मृद व जल संधारणाचे खालील प्रमाणे उपचार घेण्यात यावेत.

**क्षेत्र उपचार-** सलग समतल चर, खोल सलग समतल चर,ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बंडींग,लुज बोल्डर स्ट्रक्चर, समतल मशागत, शेततळे, मजगी पाय-यांची मजगी, जुनी भात शेती दुरुस्ती .

जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत निवडलेल्या गावातील पाणलोटाबाबत सुकाणू समितीच्या मंजूरीची अट शासन पत्र क्र. -गपावि-2015/प्र.क्र. 119/जल-7 दिनांक 30/4/02015 अन्वये शिथील करण्यात आलेली आहे. तथापि अशा पाणलोटांना सुकाणू समितीची कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक राहील.

विशेष घटक योजनाअंतर्गत उपलब्ध होणारा निधी हा अनुसूचित जाती या प्रवर्गातील शेतक-यासाठी उपलब्ध केला जाईल याची तालुका कृषि अधिकारी यांनी काळजी घ्यावी. या योजनेखाली उपलब्ध होणा-या निधीतून क्षेत्र उपचाराच्या कामांस प्राधान्य देण्यात यावे.

- सन 2017-18 या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजना (विघयो) योजनेखाली शासन पत्र क्रमांक: विघयो-2017/प्र.क्र.353/जल-7 दि. 27/07/2017 नुसार रक्कम रू.4099.12 लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. (जिल्हा निहाय तपशिल सोबत सहपत्रित)
- जलयुक्त शिवार अभियानातील निवड केलेल्या गावात विशेष घटक योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाची जास्तीत जास्त क्षेत्र उपचाराची कामे प्रस्तावित करावीत. या संवर्गातील लाभार्थीची शेती तुरळक व विखुरलेल्या स्वरुपात राहते सदरचे लाभार्थी वंचित न राहता यांनाही लाभ घेवून उन्नती साधता यावी हा हेतू ठेवून व उपचारांमध्ये विशेष घटक योजनेचा निधी अखर्चित राहणार नाही तसेच लाभार्थी वंचित राहू नयेत याची दक्षता घ्यावी.
- मंजूर पाणलोटातील उपचारांची कामे करतांना रू. 3.00 लाख किंवा त्यापेक्षा जास्त रकमेची कामे इ. निविदा पध्दतीने करण्यात यावीत. त्यासाठी या कार्यालयाचे परिपत्रक दि. 25/05/2015, व दि. 14/10/2015 तसेच अतिरिक्त मार्गदर्शक सूचना दि. 3/11/2015 व दि. 9/11/2015 यांचा अवलंब करावा.
- निधी खर्च करतांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या निधी विनियोगा बाबतच्या प्रचलित अटी व शर्तीचे कटाक्षाने पालन करावे.

- सदरहू निधी सन 2017-18 या आर्थिक वर्षासाठी वितरीत करण्यात येत असून तो या वर्षातच अपुर्ण असलेल्या पाणलोटात खर्च करण्यात यावा व मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची आहरण व संवितरण अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

- निवड करण्यात आलेल्या पाणलोटातील उपचारांना निधी उपलब्धतेनुसार तांत्रिक मान्यता घेवून प्रशासकीय मान्यतेसाठी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावेत. मा. जिल्हाधिकारी यांनी त्यास प्रशासकीय मंजुरी प्रदान करावी.

वरील अटींच्या पुर्ततेस अधिन राहून या योजनेखाली मंजूर तरतूदीतून कामावरील खर्च भागविण्यात यावा.

**2) अंमलबजावणी**

अ) या योजनेची अंमलबजावणी करतांना जलसंधारण विभागाचा दि. 10/10/2013 व दि. 15/10/2013 रोजीच्या शासन निर्णयानुसार मृद संधारण उपचारांसाठी निश्चित केलेले आर्थिक मापदंड विचारात घेण्यात यावेत.

पाणलोटातील प्रस्तावित वैयक्तिक (क्षेत्र) उपचाराच्या बाबीसाठी जागा निवड, सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रक तयार करणे, अंदाजपत्रकास मंजूरी देणे, प्रत्यक्ष कामाची अंमलबजावणी करणे या सर्व बाबी प्रचलीत कार्यपध्दतीनुसारच करण्यात याव्यात.

ब) शेततळे हा वैयक्तिक उपचार घेतांना मागेल त्याला शेततळे या योजनेचे मापदंडाचे अधिन राहून कार्यवाही करण्यात यावी.

**3) निधीची उपलब्धता**

अ) कार्यक्रम राबविण्यासाठी येणारा खर्च सन 2017-18 मध्ये मंजूर केलेल्या निधीतून भागविण्यात यावा. यासाठी जिल्हयांतील निवडलेल्या सर्व पाणलोटासाठी आवश्यक रक्कम प्रथम निश्चित करावी, नंतर सन 2017-18 या आर्थिक वर्षासाठी जिल्हयास (विघयो) उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचे पाणलोट निहाय नियोजन करण्यात यावे. मंजूर निधीचे विवरणपत्र सोबत सहपत्रित करण्यात येत आहे.

**4) निधी स्त्रोत -** शासनाच्या सामाजिक व न्याय विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती उपयोजना ( विशेष घटक योजना) याखाली मृद व जलसंधारण या उपलेखाशिर्षाखाली निधी अर्थसंकल्पीत केला जातो. हा अर्थसंकल्पीत निधी जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय मान्यतेनुसार क्षेत्रिय कार्यालयांना वितरीत केला जातो.

- जिल्हयांमध्ये सुकाणू समितीने मान्यता दिलेल्या पाणलोटांमध्ये अनुसूचित जाती लाभार्थ्यांच्या शेतावर मृद संधारणाची वैयक्तिक लाभाची कामे प्राधान्याने करण्यात यावीत. योजनासाठी प्रती वर्षाचा नियतव्यय अर्थसंकल्पीत करून घेण्याची जबाबदारी योजना कार्यान्वय

अधिकारी म्हणून संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील.पुरेसा निधी प्राप्त न झाल्यास पुरवणी मागणीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने शासनास वेळेत सादर करण्यात यावा.

- एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमासाठी विविध निधी स्त्रोतातून करावयाच्या मृद संधारणाच्या सर्व उपचारांचे कार्यन्वयासाठी कृषि आयुक्तालयाने विहीत केलेल्या निविदा पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

**5) कामाचे सनियंत्रण**

सुकाणू समितीने मान्यता दिलेल्या पाणलोटातील प्रस्तावित कामे पूर्ण करण्याची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांची राहील. मात्र जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे नियंत्रण अधिकारी म्हणून काम पहातील. यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी यांनी पाणलोटास भेट देऊन कामंाचे नियोजन आणि सुरु असलेल्या कामंाची गुणवत्ता तपासणी करण्यात यावीे. त्यांच्या भेटीची टिपणी त्यानी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना त्वरीत सादर करावी. निवडलेल्या पाणलोटातील कामाच्या नियोजन, गुणवत्ता व उपयोगिता याबाबत आलेल्या तक्रारीची जबाबदारी तालुका कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी यांच्यावर राहील याची त्याना जाणीव करुन देण्यात येत आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या मार्फत योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी.

**6) कामाचा आढावा**

या योजनेच्या कामाचा आढावा जिल्हा स्तरावरील जिल्हा पाणलोट विकास युनिट दर महा घेण्यात यावा.

**7) प्रगती अहवाल**

सविस्तर खर्चाचा भौतिक/आर्थिक साध्यासह प्रगती अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांनी दरमहा 5 तारखेस जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाने 7 तारखेस विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयास सादर करावे. विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाने विभागातील जिल्हा निहाय, पाणलोट निहाय स्ंाकलीत प्रगती अहवाल तसेच त्याची प्रत टपाल व ई-मेल व्दारे कोणत्याही परिस्थितीत 10 तारखेस कृषि आयुक्तालयास व आयुक्त समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांना सादर करावेत.

**8) इतर**

अ) सर्व स्तरावरील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना नेमुन दिलेल्या तांत्रिक, वित्तीय व प्रशासकीय जबाबदा-या व कर्तव्ये प्रचलीत पध्दतीप्रमाणेच राहतील.

ब) या कामाची दखल प्रत्येक स्तरावरील अधिकारी / कर्मचारी यांचे गोपनिय अभिलेख लिहीतांना घेण्यात यावी. खर्चाचे नियोजन नसल्यामुळे निधी उपलब्ध असतांना देखील वर्षाचे कालावधीत समप्रमाणात खर्च केला जात

नाही. परिणामी - बहुतांश निधी वर्षभर अखर्चित राहतो व वर्षाचे अखेरच्या कालावधीत शेवटच्या महिन्यात खर्च करण्यात येत असतो. यामुळे वित्तीय शिस्तिचे पालन केले जात नाही. तरी सन 2017-18 साठी खर्चाचे प्रमाण योग्यरित्या नियोजित करावे. योग्य नियोजनाअभावी वर्षा अखेरिस देयके कोषागरात सादर केल्यामुळे देयके तपासणी व पारीत करणे याविषयी कोषागार यंत्रणेवर ताण पडतो व वेळे अभावी काही देयके सदोष असल्याने पारीत होत नाहीत. म्हणून निधी व्यपगत होत असतो. तरी वेळीच देयके सादर करण्याबाबत क्षेत्रीय सतरावर सुचना देण्यात याव्यात.

**स्वाक्षरीत/-**

**संचालक**

**मृद संधारण व पाणालोट क्षेत्र व्यवस्थापन,**

**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-**1

---

जाक्र मृदस/मृद-4/मा.सू.2017-18/ 1780/2017
मृद संधारण व पाणालोट क्षेत्र व्यवस्थापन,
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-1,दि.20/09/2017

प्रति,

1) विभागिय कृषि सह संचालक नाशिक, पुणे, काल्हापूर, औरंगाबाद, लातूर, नागपूर
2) जिल्हाधिकारी, नाशिक, जळगांव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, जालना, हिंगोली, नागपूर, वर्धा, गोंदिया, चंद्रपूर
3) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नाशिक, जळगांव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, जालना, हिंगोली, नागपूर, वर्धा, गोंदिया, चंद्रपूर

प्रत - मा. प्रधान सचिव, जलसंधारण ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सादर.

प्रत - आयुक्त कक्ष कृषि आयुकतालय, पुणे-1

स्वाक्षरीत/-

संचालक

मृद संधारण व पाणालोट क्षेत्र व्यवस्थापन,

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1,

सन  2017-18 मधील विशेष घटक योजने अंतर्गत जिल्हानिहाय मंजूर तरतूद.

रक्कम रू. ( लाख)

| अ.क्र. | जिल्हा | मंजूर तरतूद |
|---|---|---|
| 1 | नाशिक | 496.10 |
| 2 | जळगांव | 86.64 |
| 3 | अहमदनगर | 68.45 |
| 4 | पुणे | 200.00 |
| 5 | सोलापूर | 300.00 |
| 6 | सातारा | 1495.22 |
| 7 | सांगली | 269.00 |
| 8 | कोल्हापूर | 500.0 |
| 9 | जालना | 50.00 |
| 10 | हिंगोली | 444.00 |
| 11 | नागपूर | 36.30 |
| 12 | वर्धा | 37.87 |
| 13 | गोंदिया | 108.00 |
| 14 | चंद्रपूर | 7.54 |
| एकूण | | 4099.12 |